# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 1st September 2025 ( No. of Pages 08 ) ( No : 13


## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, NAGPUR.

## WRIT PETITION NO.669 OF 2024

**PETITIONERS : (1)** Dr. Rajesh Dnyaneshwar Mirge, Aged about 47 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati, Ta. & Dist. Amravati.**(2)** Dr. Yogita Sahebrao Thakre, Aged about 41 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(3)** Dr. Hemant Prabhakarrao Sapkal, Aged about 47 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(4)** Dr. Ananda Bhikuji Kale, Aged about 56 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(5)** Dr. Milind Rajesh Belkhedkar, Aged about 43 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(6)** Dr. Sharayu Manoj Thorat, Aged about 56 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(7)** Dr. Gajanan Wasudeorao Belsare, Aged about 51 years, Occ. Service, R/o. C/ o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(8)** Dr. Ganpat Dewaji Deshmukh, Aged about 48 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Akola, Ta. & Dist. Akola. **(9)** Dr. Rajesh Pundlikrao Ganorkar, Aged about 48 years, Occ. Service, R/o. C/o. Mahatma Fule Arts & Commerce College, Warud, Dist. Amravati. **(10)** Dr. Sunil Ramkrushna Kondulkar, Aged about 51 years, Occ. Service, R/o. C/o. Mahatma Fule Arts & Commerce College, Warud, Dist. Amravati. **(11)** Prof. Madhuri Rajendra Umekar, Aged about 54 years, Occ. Service, R/o. C/o. Mahatma Fule Arts & Commerce College, Warud, Dist. Amravati. **(12)** Dr. Punam Vijaykumar Barabde, Aged about 47 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati, Ta. & Dist. Amravati. **(13)** Prof. Sarika Dadarao Pachraut, Aged about 50 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Gopalrao Khedkar College, (Gadegaon) Telhara, Dist. Akola. **(14)** Dr. Nandkishor Sahadeorao Gopakar, Aged about 50 years, Occ. Service, R/o. C/o. J. D. Patil Sanguldkar College, Daryapur, Dist. Amravati. **(15)** Dr. Santosh Narayan Patole, Aged about 54 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Shivaji Arts, Commerce Science College, Akot, Dist. Akola. **(16)** Dr. Manisha Marotrao Kodape, Aged about 42 years, Occ. Service, R/o. C/o. Chemistry Department of Sant Gadge Baba Amravati University, Amravati. **(17)** Dr. Anil Rameshwar Somawanshi, Aged about 47 years, Occ. Service, R/o. C/o. J. D. Patil Sanguldkar College, Daryapur, Dist. Amravati. **(18)** Dr. Jyotsna Sambhaji Pusate, Aged about 52 years, Occ. Service, R/o. C/o. J. D. Patil Sanguldkar College, Daryapur, Dist. Amravati. **(19)** Dr. Avinash Sharadrao Dhobe, Aged about 42 years, Occ. Service, R/o. C/o. Shyamaprasad Mukherjee College, Shendurjana Ghat, Tq. Warud, Dist. Amravati. **(20)** Dr. Kalpana Narayanrao Pawar, Aged about 49 years, Occ. Service, R/o. C/o. Science College, Congress Nagar, Nagpur. **(21)** Dr. Vishwanath Akoji Kodape, Aged about 52 years, Occ. Service, R/o. C/o. Science College, Pauni, Dist. Bhandara. **(22)** Dr. Atulkumar Biharilal Sahare, Aged about 43 years, Occ. Service, R/o. C/o. Science College, Pauni, Dist. Bhandara.**(23)** Dr. Ravindrakumar Sahebrao Dhande, Aged about 46 years, Occ. Service, R/o. C/o. Shri S. R. Lahoti Science College, Morshi, Dist. Amravati. **(24)** Dr. Sanjay Janardhan Aglawe, Aged about 50 years, Occ. Service, R/o. C/o. J. D. Patil Sanguldkar College, Daryapur, Dist. Amravati. **(25)** Dr. Manisha Shankar Yadav, Aged about 45 years, Occ. Service, R/o. C/o. Shri Gadge Maharaj College, Karanja Road, Murtizapur, Dist. Akola. **(26)** Dr. Kishor Marotrao Taksande, Aged about 51 years, Occ. Service, R/o. C/o. Arts & Science College, Kurha, Tq. Teosa, Dist. Amravati. **(27)** Dr. Anant Madan

---

### Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.09.2025**

**From :**
**Dr.Nitin C. Kongre**
Secretary, NUTA
Plot No. 144, Gayatri Nagar,
Behind IT Park, Nagpur-440022

**To,**
All the members
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that the General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.Nitin C. Kongre,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting 12.00 Noon on Sunday, the 16th November 2025***

---

Awati, Aged about 44 years, Occ. Service, R/o. C/o.Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College, Deulgaon Raja, Dist. Buldhana. **(28)** Prof. Sandip Bhaskarrao Jagtap, Aged about 60 years, Occ. Service, R/o. C/o.Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College, Deulgaon Raja, Dist. Buldhana.

**VERSUS**

**RESPONDENTS : (1)** The State of Maharashtra, Through its Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai-440032. **(2)** The Director of Higher Education, State of Maharashtra, Central Building, Pune-01. **(3)** The Joint Director of Higher Education, Amravati Division, Amravati. **(4)** The Joint Director of Higher Education, Nagpur Division, Nagpur.

Shri A. I. Sheikh, Advocate for petitioners. Shri A. S. Fulzele, Additional Government Pleader for respondent Nos.1 to 4.

## CORAM: SMT. M. S. JAWALKAR AND PRAVIN S. PATIL, JJ.

## DATE : 13/08/2025.

### ORAL JUDGMENT

### (PER : PRAVIN S. PATIL, J.)

**1.** Rule. Rule made returnable forthwith. By consent of learned Counsel for the parties, the matter is taken up for final disposal.

**2.** By this petition, the prayer is made by the petitioners to declare that the petitioners are governed by the provisions of Old Pension Scheme and their services shall not be governed by the provisions of New Defined Contributory Pension Scheme (DCPS) introduced by the Government Resolution dated 31/10/2005.

**3.** It is undisputed fact that in the present petition, petitioners are working as a full time approved lecturers and serving at Aided Colleges, which are Affiliated to the NonAgricultural Universities.

**4.** Petitioners to substantiate their submission that the recruitment exercise was initiated before cut off date prescribed in Government Resolution dated 31/10/2005, provided the details of date of advertisement and date of appointment are as under :-

(Sr.No.) Name of Teacher (Date of Advertisement) Date of Appointment order

(1) Dr. Rajesh D. Mirge (20/10/2005) 10/02/2006

(2) Dr. Yogita S. Thakare (20/10/2005) 13/02/2006

(3) Dr. Hemant Prabhakarrao Sapkal (20/10/2005) 23/03/2006

(4) Dr. Ananda B. Kale (20/10/2005) 08/02/2006

(5) Dr. M. R. Belkhedkar (20/10/2005) 08/02/2006

(6) Dr. Sharyu M. Thorat (Ku. S. K. Deshmukh) (20/10/2005) 08/02/2006

(7) Dr. G. W. Belsare (20/10/2005) 10/02/2006

(8) Dr. Ganpat D. Deshmukh (20/10/2005) 20/02/2006

(9) Dr. Rajesh P. Ganorkar (20/10/2005) 22/03/2006

(10) Dr. Sunil R. Kondakar (20/10/2005) 10/02/2006

(11) Prof. Madhuri R. Umekar (20/10/2005) 10/02/2006

(12) Dr. Punam V. Barabdhe (20/10/2005) 10/02/2006

(13) Prof. Sarika D. Pachraut (20/10/2005) 10/02/2006

(14) Dr. Nandkishor S. Gopakar (20/10/2005) 22/03/2006

(15) Dr. Santosh N. Patole (20/10/2005) 10/02/2006

(16) Dr. Manisha M. Kodape (20/10/2005) 13/02/2006

(17) Dr. Anil R. Somavanshi (20/10/2005) 23/02/2006

(18) Dr. Jyotsna S. Pusate (20/10/2005) 13/02/2006

(19) Dr. Avinash S. Dhobe (30/06/2005) 19/11/2005

(20) Dr. Kalpana N. Pawar (20/10/2005) 16/02/2006

(21) Dr. V. A. Kodape (20/10/2005) 13/02/2006

(22) Dr. Atul B. Sahare (20/10/2005) 28/03/2006

(23) Dr. R. S. Dhande (20/10/2005) 17/02/2006

(24) Dr. Sanjay J. Aglawe (20/10/2005) 13/02/2006

(25) Dr. Manisha S. Yadav (04/10/2005) 25/01/2006

(26) Dr. Kishor M. Taksande (28/09/2005) 01/12/2005

(27) Dr. Anant M. Awati (20/09/2005)14/11/2005

(28) Prof. Sandip B. Jagtap (20/09/2005) 14/11/2005

**5.** In view of above, it is the submission of petitioners that they are entitled for benefit of old pension scheme in terms of subsequent Government Resolution dated 02/02/2024 wherein it is made clear that the recruitment exercise initiated before cut off date and appointed subsequently are entitled for old pension scheme. Hence, to seek the declaration as stated above, the present petition came to be filed.

**6.** Per contra, learned Additional Government Pleader has strongly opposed the petition by stating that the policy framed by the Government is not applicable to the University teachers as they do not fall in the definition of “Government Servants” and accordingly, it is his submission that the policy framed by the State Government is not applicable to them.

**7.** It is further stated that the advertisement, selection process, approval and the appointment of the petitioners are not the subject of answering respondent. The entire process is within the competence of management / society of the petitioners and therefore, considering the fact that the appointments were made by the respective management / society, Higher and Technical Education Department cannot be held responsible in the matter and accordingly, DCPS scheme cannot be made applicable to the petitioners.

**8.** We have heard learned counsel for the parties and considered the documents placed on record. **It is clear from the Government Resolution dated 31/10/2005 that same would be applicable to the employees who are recruited on or after 01/11/2005 in the service of the Recognized and Aided Educational Institutions,** Non-Agricultural Universities and Affiliated Non-Governmental Colleges and Agricultural Universities, etc. Hence, considering the policy framed by the State

Government, it is clear that the same was made applicable to the employees of Non-Agricultural Universities. Therefore, objection raised by Respondent is not sustainable in the eyes of law.

**9.** In the present petition, the Government Resolution dated 02/02/2024 is produced on record. Accordingly, **Government itself clarified that if the recruitment exercise is started before the cut off date i.e. 01/11/2005, and employees were appointed, thereafter in pursuance of that recruitment exercise, will be entitled for the benefit of Old Pension Scheme.**

**10.** Furthermore, this Court in Writ Petition No.3715/2022 has dealt with the identical issue and recorded the findings in Para Nos.7 and 8 which are reproduced as under :-

*"7. The issue is not res integra. The Principal Bench of this Court in the case of Khilari Rajendra Eknath and others v. The State of Maharashtra and others in Writ Petition No.2270 of 2021 has already dealt with this issue and it will be advantageous to reproduce paragraphs 27 and 28 of the said judgment, which read thus -*

*"27. Sub-Rule (2) of Rule 2 of the M.C.S.(Pension) Rules, 1982 states that these rules would not apply to the Government Servants who are recruited on or after 01.11.2005. Rules 1982 are the beneficial piece of legislation governing the post retiral benefits to a government employee. It has been held time and again that pension is not a bounty. Rules 1982 are not made applicable to the government servants who are recruited on or after 01.11.2005. Though the amendment to the Rules 1982 by the State Government are based upon the amendment carried out in the Central Civil Services (Pension) Rules, 1972 there is a subtle difference between the two. The Central Civil Services (Pension) Rules, 1972 apply to the Government Servants appointed on or before 31.12.2003 meaning thereby that it would not apply to the government servants appointed on or after 1st day of January, 2004. Whereas under the said M.C.S. (Pension) Rules, 1982, the wordings are 'the Rules shall not apply to government servants who are recruited on or after 01.11.2005'. The phraseology "Recruitment" and "Appointment" are not synonymous. There is a marked distinction between "Recruitment" and "Appointment". Recruitment is a stage prior to appointment. Recruitment is the process which entails selection of candidates. Selection is a process of picking the candidates from the short listed candidates. An appointment means an actual act of posting a person to a particular office.*

*8. Thus, as per Pension Rules, Old Pension Scheme would not apply to the persons whose recruitment process had commenced after 01/11/2005, meaning thereby the Old Pension Scheme shall apply to the persons, who are recruited in the government services prior to 01/11/2005. Appointment does not mean recruitment. Recruitment entails selection process. In the present petitions though the appointments were made after 01/11/2005, the selection process started prior to 01/11/2005 by publishing the advertisement. Admittedly, the advertisements in this batch of petitions were issued prior to 01/11/2005, however, the appointment orders of the petitioners were issued after cutoff date i.e. 01/11/2005 on which date DCPS is made applicable to all government servant as per GR dated 31/10/2005 and Pension Rules. Therefore, the petitioners shall be entitled to be governed by the Old Pension Scheme and General Provident Fund Scheme which were in vogue prior to 01/11/2005. Resultantly, the petitions succeeded."*

**11.** In view of above, we are of the view that the petitioners are entitled to get the benefit of Old Pension Scheme as their recruitment was started before the cut off date issued by the Government Resolution as indicated in the abovementioned chart. Accordingly, we pass following order :-

**ORDER**

(i) Writ Petition is allowed.

(ii) **It is declared that the petitioners shall be governed by the provisions of Old Pension Scheme** which was in vogue prior to 01/11/2005 and accordingly, necessary steps be taken by the respondents **to accord benefits of Old Pension Scheme to the petitioners within a period of three months.**

(iii) Rule is made absolute in above terms with no order as to costs.

**(PRAVIN S. PATIL, J.)** **(SMT.M.S.JAWALKAR, J.)**

*प्रश्न जुनी पेन्शन योजना लागू होण्याचा : २*

## सन २०२४ च्या याचिका क्रमांक ६६९ मध्ये सहभागी असलेल्या याचिकाकर्त्या शिक्षकांची बैठक

१ नोव्हेंबर २००५ नंतर नेमणूक झालेल्या पण भरती प्रक्रिया त्या तारखेपूर्वी सुरू झालेल्या शिक्षक - कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या सन २०२४ च्या याचिका क्रमांक ६६९ चा निकाल दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी या शिक्षकांच्या बाजूने लागला असून तो याच अंकात प्रसृत करण्यात आलेला आहे.

अशाच प्रकरणी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक २८ एप्रिल २०२३ रोजी एक महत्त्वपूर्ण निर्णय W.P.No. 2270 of 2021 या प्रकरणात (113/23) दिलेला आहे. **ज्या शिक्षक / कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष नेमणूक ही १ नोव्हेंबर २००५ नंतर झालेली असेल परंतु त्यांची भरती प्रक्रिया ही १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सुरू झालेली असेल त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी लागेल** असे त्या निर्णयात नमूद आहे.

या निर्णयावर आधारित तसाच दुसरा एक निर्णय मा.नागपूर खंडपीठाने दिनांक २८ जून २०२३ रोजी तत्सम प्रकरणी (124/23) दिलेला आहे. **'भरती प्रक्रिया' आणि 'नेमणूक' या दोनमध्ये फरक आहे असे मा.उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे नमूद केलेले आहे.**

सन २०२४ च्या याचिका क्रमांक ६६९ मध्ये सहभागी असलेल्या याचिकाकर्त्या शिक्षकांची बैठक बोलाविण्यात आलेली असून या बैठकीत मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेला निर्णय विचारात घेता पुढे करावयाच्या कारवाईसंबंधी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. बैठकीचे तपशील सोबतच्या तक्त्यात नमूद केलेले आहेत. सर्व संबंधितांनी उपस्थित रहावे ही विनंती. - **डॉ.नितिन कोंगरे, *सचिव, 'नुटा'***

| *तक्ता* |
|---|
| **सभेचे ठिकाण :** श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती |
| **सभेचा दिवस व दिनांक :** रविवार, दिनांक १४ सप्टेंबर, २०२५ |
| **सभेची वेळ :** दुपारी २.०० वाजता |

*दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्रशासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत.*

# महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

*शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४,* मंत्रालय, मुंबई - ४०००३२

## दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२४

**संदर्भ :** (१) वित्त विभाग, शा.नि.क्र. : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५. (२) केंद्र शासनाच्या निवृत्ती वेतन व निवृत्ती वेतन धारकांचे कल्याण विभागाचे पत्र क्र. ५७/०५/२०२१-पी व पीडब्ल्यू (बी), दि. ०३.०३.२०२३.

### *प्रस्तावना*

संदर्भ क्र. १ येथील दि. ३१.१०.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यशासनाच्या सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना राज्यात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. केंद्रशासनाने संदर्भ क्र. २ येथील दि. ०३.०३.२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये केंद्रशासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती (Appointed) ज्या पदावर किंवा रिक्त जागेवर करण्यात आली आहे, ज्याची जाहिरात/भरतीची/नियुक्तीची अधिसूचना नवीन पेन्शन योजना लागू करण्याच्या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी म्हणजेच २२.१२.२००३ पूर्वी निर्गमित झाली आहे व जे दि. ०१.०१.२००४ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत दाखल झाले व ज्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू झाली त्या केंद्रशासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांना केंद्रीय नागरी सेवा (निवृत्ती) नियम, १९७२/२०२१ लागू करण्याचा एक वेळ पर्याय देणेबाबत (One Time Option) निर्णय घेतला आहे. सदर केंद्रशासनाच्या निर्णयाच्या धर्तीवर दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी राज्यशासनाच्या सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेची बाब विचाराधीन होती. **याबाबत मा.मंत्रीमंडळाने दि. ०४ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत मंजुरी दिली असून त्यानुसार शासननिर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबतचा शासननिर्णय खालीलप्रमाणे आहे.**

### *शासननिर्णय*

दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्रशासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक **नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात येत आहे.**

२. संबंधित राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा सदर पर्याय हा **सदर शासन निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) लागू राहील. राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील.**

३. जुनी निवृत्तीवेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय संबंधित राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करावा. **सदर शासननिर्णयातील तरतुदीनुसार संबंधित राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी हा जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू होण्यास पात्र झाल्यास तशा पद्धतीचे कार्यालयीन ज्ञापन संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने पर्याय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत निर्गमित करावे.** तसेच संबंधित राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील खाते नियुक्ती प्राधिकाऱ्याने तात्काळ बंद करावे.

४. जे राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते (GPF) उघडण्यात यावे व सदर खात्यात राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी.

५. जे राज्यशासकीय अधिकारी/कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील राज्यशासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**६. सदर शासननिर्णय मा.मंत्रीमंडळाने दि. ०४ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.**

७. सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४०२०२१८२९४५८६०५ असा आहे. हा शासननिर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(मनिषा कामटे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

---

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जानेवारी, २०२५ पासून सुधारणा करण्याबाबत.*

## *महाराष्ट्र शासन : वित्त विभाग*

*शासन निर्णय क्रमांक : मभवा-१३२५/प्र.क्र.९/सेवा-९*
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२

**दिनांक : ११ ऑगस्ट, २०२५**

**वाचा :** भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग कार्यालयीन ज्ञापन क्रमांक : १/१(१)/२०२५-इ.II (बी), दिनांक २ एप्रिल, २०२५

### *शासननिर्णय*

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जानेवारी, २०२५ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५३% वरून ५५% करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जानेवारी, २०२५ ते दिनांक ३१ जुलै, २०२५ या कालावधीतील थकबाकीसह माहे ऑगस्ट, २०२५ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०८११११२२०३७३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(वि.अ.धोत्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

PR : (1) P 16 NB 2019 (2) P 140 NB 2019 (3) P 12 NB 2020 (4) P 279 NB 2021 (5) P 100 NB 2022 (6) P 165 NB 2022 (6) P 28 NB 2023 (7) P 116 NB 2023 (8) P 116 NB 2023 (9) P 099 NB 2025 (10) P 152 NB 2025

*दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरतीची जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या तथापि, दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्रशासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणेबाबत...*

# महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन आदेश क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९२/ई-८०९७६८/मशि-१ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई-४०००३२

## दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२४

**वाचा :-** (१) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४, दि.०२.०२.२०२४ (२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२४/प्र.क्र.१८/सेवा-४, दि.०२.०५.२०२४

### *प्रस्तावना*

वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र. (१) येथील दिनांक ०२.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेत जे अधिकारी/कर्मचारी दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त करण्यात आले आहेत. तथापि, त्यांची पदभरतीची जाहिरात/अधिसूचना दि. ०१.११.२००५ पूर्वी निर्गमित झालेली आहे, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमांच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र महाविद्यालयीन शिक्षण सेवा, गट-अ (वरिष्ठ महाविद्यालयीन शाखा) व महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशिक्षण शाखा), गट-अ या संवर्गातील दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरतीची जाहिरात आलेल्या तथापि, दि. ०१.११.२००५ रोजी वा त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या अधिव्याख्यात्यांचे जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणेबाबतचे अर्ज/विकल्प शासनास प्राप्त झाले आहेत.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जाहिरात क्र. १०, दि. ३०.०३.२००५ (अधिसूचना क्र. १५(२)/(१३)/९९८/X, दि.३०.०३.२००५, अधिसूचना क्र. १५(२)/(१८०)/२५१-SD/X, दि. ३०.०३.२००५ व अधिसूचना क्र. १५(२)/(१७८/४)/३२९-SD/X, दिनांक ३०.०३.२००५) अन्वये अधिव्याख्याता, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) व महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशिक्षण शाखा) (अनुशेषाची पदे) या पदांच्या सरळसेवा भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार पात्र उमेदवारांना उच्च व तंत्र शिक्षण विभागात अधिव्याख्याता, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा)/महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशिक्षण शाखा), गट-अ, या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

३. सबब, उपरोक्त परिच्छेदात नमूद जाहिरातीस अनुसरून नियुक्ती देण्यात आलेल्या अधिव्याख्याता यांना वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०२.०२.२०२४ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत.

### *शासन आदेश*

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खालील विवरणपत्रात नमूद करण्यात आलेल्या, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) व महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशिक्षण शाखा), गट-अ या संवर्गातील अधिव्याख्यात्यांना वित्त विभागाच्या संदर्भाधिन दिनांक ०२.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यात येत आहे.

(अ.क्र.) अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम : मूळ संवर्ग : संस्था/महाविद्यालय : विकल्प अर्ज दिनांक

(१) डॉ.रुपेश निवृत्ती राऊत, सहायक प्राध्यापक (प्राणीशास्त्र) : अधिव्याख्याता : एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई : २८.०२.२०२४

(२) डॉ.जयश्री जयवंतराव भुक्तर, सहायक प्राध्यापक (सुक्ष्मजीवशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विज्ञान संस्था, छत्रपती संभाजीनगर : २१.०३.२०२४

(३) डॉ.भगवान पांडूरंग कांबळे, सहायक प्राध्यापक (हिंदी) : अधिव्याख्याता : शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर : २२.०२.२०२४

(४) डॉ.विश्वनाथ महादू देशमुख, सहायक प्राध्यापक (हिंदी) : अधिव्याख्याता : राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर : १८.०३.२०२४

(५) डॉ.उज्वला शिवाजी देशमुख, सहायक प्राध्यापक (प्राणिशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती : १२.०२.२०२४

(६) डॉ.शितल मनोज पंचीकर (सोनार), सहायक प्राध्यापक (इतिहास) : अधिव्याख्याता : इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई : ०२.०३.२०२४

(७) डॉ.प्रतिभा हरिश्चंद्र रोहणकर, सहायक प्राध्यापक (प्राणिशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती : १४.०२.२०२४

(८) श्री.सुनिल अर्जुन सोनवणे, सहायक प्राध्यापक (भूगोल) : अधिव्याख्याता : शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई : २३.०३.२०२४

(९) डॉ.चरणदास युवराज कांबळे, सहायक प्राध्यापक (भूगोल) : अधिव्याख्याता : शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी : २६.०३.२०२४

(१०) डॉ.रामेश्वर शेकुभाऊ पदमे, सहायक प्राध्यापक (भूगोल) : अधिव्याख्याता : शासकीय अध्यापक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर : २६.०३.२०२४

(११) श्री.राजेंद्र गंगाधर चौरे, सहायक प्राध्यापक (सुक्ष्मजीवशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विज्ञान संस्था, मुंबई : २०.०२.२०२४

(१२) डॉ.विठ्ठल रामराव मोरे, सहायक प्राध्यापक (प्राणिशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर : ०६.०३.२०२४

(१३) डॉ.अरुणा कृष्णराव कावडकर, सहायक प्राध्यापक (प्राणिशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विज्ञान संस्था, नागपूर : ०७.०२.२०२४

(१४) डॉ.गौतम मधुकर माने, सहायक प्राध्यापक (इंग्रजी) : अधिव्याख्याता

: महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर : २२.०३.२०२४

(१५) डॉ.सुषमा लक्ष्मीकंत दामोदरे, सहायक प्राध्यापक (भूगोल) : अधिव्याख्याता : वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर : १४.०२.२०२४

(१६) डॉ.अविनाश वसंतराव तलमले, सहायक प्राध्यापक (भूगोल) : अधिव्याख्याता : वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर : ०६.०२.२०२४

(१७) डॉ.निता वा. अंदुरे (यावले), सहायक प्राध्यापक (संख्याशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती : १३.०२.२०२४

(१८) डॉ.तेलगोटे महेंन्द्र रणधीर, सहायक प्राध्यापक (इंग्रजी) : अधिव्याख्याता : सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई : १०.०३.२०२४

(१९) डॉ.वैशाली संतोष देशमुख, सहायक प्राध्यापक (संगीत) : अधिव्याख्याता : शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर : २३.०२.२०२४

(२०) डॉ.मोहन आत्माराम सोनार, सहायक प्राध्यापक (भूगर्भशास्त्र) : अधिव्याख्याता : शासकीय विज्ञान संस्था, छत्रपती संभाजीनगर : ०७.०२.२०२४

२. उपरोक्त विवरणपत्रात नमूद अधिव्याख्याते यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व अनुषंगिक नियम लागू करणेबाबतचा विकल्प विहित मुदतीत सादर केला आहे.

३. संदर्भीय क्र. (१) येथे नमूद वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ०२.०२.२०२४ नुसार उपरोक्त विवरणपत्रात नमूद अधिव्याख्याता यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व अनुषंगिक नियम लागू करण्यात येत असल्याने त्यांचे भविष्य निर्वाह निधी (GPF) खाते तात्काळ उघडण्यात यावे. तसेच सदर अधिव्याख्यात्यांचे राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (NPS) मधील खाते बंद करून, त्यातील त्यांच्या हिश्याची रक्कम देय/अनुदेय व्याजासह संबंधितांच्या उघडण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावी. याकरिता कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत संदर्भीय क्र. (२) येथे नमूद वित्त विभागाच्या दि. ०२.०५.२०२४ रोजीच्या परिपत्रकात विहित केलेली कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४११२६१६२४३६८६०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अशोक मांडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

*Dearness Relief Increase to 55% on Pension/Family Pension w.e.f. 1 st January, 2025.*

## GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT

Government Resolution No.: DRP-2025/CR. 42 /SER-4
*Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,*
*Mantralaya, Mumbai 400 032.*

**Date: 11.08.2025.**

**Read -** Government Resolution, Finance Department No.: DRP-2025/C.R 5/SER-4, dated 28.02.2025.

**RESOLUTION**

**Government is pleased to decide that the rate of dearness relief with effect from 1st January, 2025 will be revised from 53% to 55% to the State Government pensioners /family pensioners on their Basic Pension/Family Pension. Revised dearness relief with arrears from 1st January 2025 will be payable in cash with pension / family pension of the month of August 2025.**

**2.** It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. the Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

**3.** Government is also pleased to direct that above decision should mutatis mutandis, apply to those pensioners including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Agricultural / Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government colleges to whom the pension scheme is made applicable.

**4.** In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf. Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

**5.** The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

**6.** All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, mutatis mutandis, apply to the dearness relief now sanctioned.

**7.** This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202508111220004505. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**(Manisha Kamte)**
Deputy Secretary to Government of Maharashtra

PR : (1) P 20 NB 2019 (2) P 137 NB 2019 (3) P12 NB 2020 (4) P 281 NB 2021 (5) P 101 NB 2022 (6) P 165 NB 2022 (7) P 27 NB 2023 (8) P 127 NB 2023 (9) P 11 NB 2024 (10) P 099 NB 2025 (11) P 154 NB 2025

*उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी उमेदवारांची पात्रता तपासून पात्र उमेदवारांची शिफारस करण्यासाठी निवड समिती गठित करणेबाबत.*

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१ मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई-४०००३२

## दिनांक : १० जुलै २०२५

**वाचा** : (१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०२२/(प्र.क्र.२७५/१४)/मशि-१, दि. ३ नोव्हेंबर, २०२२

(२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१, दि. ०६.०५.२०२४

### *प्रस्तावना*

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम होऊन सदर पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांची नियुक्ती करण्यास काही अतिरिक्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेऊन १० विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) तसेच ०२ सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी संदर्भीय दि. ०३ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये निवड समिती गठित करण्यात आली असून अतिरिक्त कार्यभाराने नियुक्तीसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव, अटी व शर्ती विहित करण्यात आल्या होत्या. सदर निवड समितीचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेसाठी नव्याने निवड समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### *शासननिर्णय*

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील १० विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व ०२ सहसंचालक (प्रशासन) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यासाठी पात्र उमेदवारांची शिफारस करण्यासाठी संदर्भीय दि. ०३ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या निवड समितीचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने पुढीलप्रमाणे नवीन समिती गठित करण्यात येत आहे. :-

(अ.क्र.) नाव व पदनाम (पद)

(१) डॉ.विजय माहेश्वरी, कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (अध्यक्ष)

(२) डॉ.शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण, पुणे (सदस्य)

(३) डॉ.विनोद मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई (सदस्य)

(४) श्री.अशोक मांडे, उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (सदस्य सचिव)

२. सदरहु समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहिल :-

(अ) उच्च शिक्षण संचालनालयाच्या आस्थापनेवरील विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) या पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांनुसार त्यांच्या कामाचा आढावा (कार्यालयातील मागील एक वर्षाच्या कालावधीत निपटारा झालेल्या प्रकरणांची टक्केवारी, कार्यालयास प्राप्त होणारे प्रस्ताव निकाली निघण्यास लागणारा सरासरी कालावधी, Physical व ई ऑफीस स्वरूपात सादर करण्यात आलेल्या नस्त्यांची टक्केवारी, मा.उच्च न्यायालयात दाखल प्रकरणे, शपथपत्र दाखल झालेली प्रकरणे, शासनाच्या बाजूने निकाल लागलेली प्रकरणे, शासनाच्या विरुद्ध निकाल लागलेली प्रकरणे, कार्यभार घेतल्यानंतर अधिनस्त अनुदानित महाविद्यालयांचे करण्यात आलेल्या अनुदान निर्धारणाची माहिती (उदा. अनुदानित महाविद्यालयांची संख्या, अनुदान निर्धारण केलेल्या महाविद्यालयांची संख्या व निर्धारणाची वर्षे, प्रलंबित अनुदान निर्धारण केलेल्या महाविद्यालयांची संख्या व निर्धारणाची वर्षे व त्याची टक्केवारी, अनुदान निर्धारणानंतर वसुलीची केलेली कार्यवाही इ.), प्राप्त तक्रारी, इ.) घेऊन त्यांच्याकडील कार्यभार चालू ठेवावा व तो संपुष्टात आणून प्रशासकीय कारणास्तव नवीन अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविणे आवश्यक आहे, याबाबत शासनास शिफारस करणे.

(ब) ज्या विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) या पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांचा कार्यभार प्रशासकीय कारणास्तव अन्य अधिकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक आहे. त्या विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) या पदासाठी संदर्भीय दि. ०६.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली पात्रता धारण करणाऱ्या सहायक प्राध्यापक (निवडश्रेणी)/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक या संवर्गातील इच्छुक उमेदवारांकडून त्यांच्या सेवा तपशीलासह अर्ज मागविणे.

(क) तसेच ज्या सहसंचालक (प्रशासन) या पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांचा कार्यभार प्रशासकीय कारणास्तव अन्य अधिकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक आहे, त्या सहसंचालक (प्रशासन) या पदासाठी संदर्भीय दि. ०६.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली पात्रता धारण करणाऱ्या उच्च शिक्षण संचालनालयातील व अधिनस्त कार्यालयातील वरिष्ठ प्रशासन अधिकारी व प्रशासन अधिकारी या पदावरील विहित अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून त्यांच्या सेवा तपशीलासह अर्ज मागविणे.

(ड) विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) तसेच सहसंचालक (प्रशासन) या पदांसाठी अतिरिक्त कार्यभाराने नियुक्तीकरिता संदर्भीय शासन निर्णय दि.०६.०५.२०२५ अन्वये विहित करण्यात आलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा इ. बाबींची तपासणी करणे.

(इ) प्राप्त अर्जाची तपासणी करून, अर्जदारांची परिपूर्ण माहिती, त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशी चालु/प्रस्तावित आहे किंवा कसे, मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी ही माहिती आणि सध्या कार्यरत असलेल्या विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) व सहसंचालक (प्रशासन) यांनी अर्ज केला असल्यास, उपरोक्त २ (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे तपासणी करण. (याकरिता आवश्यकत ती माहिती/कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण यांची राहिल.)

(ई) शासन पत्र क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.१३९/ई-१०८१६६३/मशि-१, दि.१० जुलै, २०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागीय संचालक (उच्च शिक्षण) व संचालक (प्रशासन) या पदांकरिता मुलाखतीच्या गुणांचे वर्गीकरण, उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, प्रकाशने, गोपनीय अहवाल व मुलाखत विचारात घेऊन गुणांकन करणे.

(उ) विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) या पदासाठी विहित करण्यात आलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव व वयोमर्यादा, तसेच सहसंचालक (प्रशासन) या पदांकरिता विहित करण्यात आलेली अर्हता व गुणांकनानुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन, गुणवत्ता यादी शासनास सादर करणे.

३. **समितीचा कालावधी** : सदर समितीचा कालावधी हा केवळ एकच निवड प्रक्रिया राबविण्यापुरता म्हणजेच गुणवत्तेनुसार निवडसूची शासनास सादर करेपर्यंत राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०७१०१५१४८११०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अशोक मांडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**PRESS INFORMATION BUREAU**
**GOVERNMENT OF INDIA**
*****

Highlights of Minimum Qualifications for Appointment of Teachers in Universities and Colleges and Measures for Maintenance of Standards in Higher Education

Ph.D Degree will be mandatory for direct recruitment to Assistant Professors in Universities w.e.f. 01.07.2021

- Shri Prakash Javadekar

**June 13th, 2018, New Delhi**

In order to attract and retain the best quality teachers and other academic staff in Universities and Colleges, the UGC has brought out new regulations. This was disclosed by Union Minister for Human Resource Development, Shri Prakash Javadekar while addressing media persons in New Delhi today. The Highlights of the Regulations are as below:

1. Incentives to teachers as provided in the earlier Regulations of 2010 and subsequent amendments have been retained. These include incentives for M.Phil/Ph.D.

2. API based PBAS System has been removed. A new simplified teacher evaluation grading system has been introduced and research score added for Universities to improve research output.

3. Promotion criteria under CAS for University teachers has been made more research oriented while in case of College teachers, CAS criteria is more focused on teaching.

4. For the first time provision for promotion in Colleges will be up to Professor level.

5. Special provision for recruitment of Assistant Professors in Universities and Colleges for Ph.D Degree holders from a University/Institution in the top 500 Global rankings has been made.

6. The Regulations mandate introduction of one month induction programme for newly recruited Assistant Professors in Universities/Colleges/Higher Education Institutions.

7. Ph.D Degree has been made mandatory for promotion to Assistant Professor (Selection Grade) in colleges from 01.07.2021. Ph.D Degree will be mandatory for direct recruitment to Assistant Professors in Universities w.e.f. 01.07.2021.

8. For the first time, weightages are assigned for CAS in respect of MOOCs and E-Content in Universities and Colleges.

9. Research clusters will be created in the Universities within the State for sharing research facilities, skills and infrastructure to ensure optimal utilization of resources and creating synergies amongst higher education institutions.

10.Up to 10% of the existing sanctioned strength of Professors in Universities shall be appointed as Senior Professors in the Universities. Senior Professors in Universities will be appointed through direct recruitment and through promotion under CAS.

11.Universities will accord permission and provide need based facilities to Colleges teachers to supervise Ph.D/M.Phil scholars.

12.Special category of medal winners in Olympics, Asian Games and Commonwealth Games in eligibility criteria for Assistant Director/College Director, Physical Education and Sports and Deputy Director, Physical Education and Sports in Universities has been made to promote sports in Universities and Colleges.

**Note:** ***Ph.D Degree shall be mandatory requirement for Direct Recruitment to the post of Assistant Professors in University with the effect from 1st July, 2021. However Masters degree with NET or Ph.D. will continue to be the minimum eligibility requirement for Direct Recruitment to the post of Assistant Professors in colleges.***

***महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग***

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
ई-मेल : vishi1-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३१७४
क्रमांक : संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१
**दिनांक : १८.०७.२०२५**

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

**विषय** : एम.फील अर्हता धारण केलेल्या १४२१ अध्यापकांना एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत.

**संदर्भ** : उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र क्र. FNo.10-18/2024 (PS/Misc), दिनांक २ जुलै, २०२५.

एम.फील पदवी धारण करणाऱ्या अध्यापकांना एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट द्यावी, अशी मागणी विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली होती. त्यानुसार एम.फील पदवी धारण केलेल्या अध्यापकांना एन.ई.टी. परीक्षेमधून सूट देण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास समक्रमांकाच्या दिनांक १५ जुलै, २०२४ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. **त्यानुसार अशा प्रकरणांची तपासणी करण्यासाठी आयोगाकडून तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. आयोगाने नेमलेल्या समितीकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात आली आहे. समितीच्या शिफारशीनुसार**, **११.०७.२००९ पूर्वी एम.फील पदवी पूर्ण केलेल्या आणि १४ जून २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या**, नियमित/कायमस्वरूपी सेवेत असलेल्या, १४२१ शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्याचा निर्णय, आयोगाच्या २४.०६.२०२५ रोजी झालेल्या ५९१ व्या बैठकीत घेण्यात आला आहे. असे विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. २ जुलै, २०२५ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

०२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २ जुलै, २०२५ च्या पत्राची प्रत, सोबतच्या तक्त्यासह आपल्याकडे पाठविण्यात येत आहे. तसेच याबाबत संक्षिप्त माहितीचा तक्ता परिशिष्ट-अ अन्वये सोबत जोडला आहे. त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

**(प्रताप पां. लुबाळ)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**सोबत** :- वरीलप्रमाणे

**प्रत** : माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित (१) कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे (२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण (३) निवड नस्ती (विशि-१)

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 27.08.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.09.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,......................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................